डॉ. आ. ना. सूर्यकर
पीएच. डी. एफएसीबीआय
कुलसचिव

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

वणी रोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४, **Vani Road, Mhasrul, Nashik – 422 004**
**Phone :** 0253-25393837/**EPABX:** 0253-2539100-300 / **Fax:** 0253-2539200
**E-mail:** pgacademic@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com
दुरध्वनी क्र. (०२५३) २५३९१९९

जा.क्र. मआविवि/पीजी/ई. ओ./१३०४/२०११ दि. २३/०६/२०११

## परिपत्रक क्र. १३/२०११

*प्रति,* *(शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी)*

मा. प्राचार्य / अधिष्ठाता,
सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

विषय :- विद्यापीठ पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या Research Methodology कार्यशाळेतील सहभागाबाबत...

संदर्भ :- विद्यापरिषद ठराव क्र. ६२/२०११ दि. ०८/०४/२०११

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. कुलगुरु यांनी गठीत केलेल्या "Vision Committee" च्या दि. २३/०३/२०११ रोजीच्या बैठकीतील शिफारशी मा. विद्यापरिषदेच्या दि. ०८/०४/२०११ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आल्या असता त्यावर विद्यापरिषद ठराव क्र. ६२/२०११ अन्वये झालेल्या निर्णयास अनुसरुन खालील नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही महाविद्यालयामार्फत करण्यात यावी.

१) वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व युनानी, होमिओपॅथी आणि तत्सम विद्यांशाखेतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून प्रवेशित विद्यार्थ्यांना Research Methodology कार्यशाळेतील सहभाग हा अनिवार्य करण्यात यावा.

२) विद्यार्थ्यांनी त्यांच्या Research Methodology कार्यशाळेतील सहभागाचे प्रमाणपत्र अंतिम वर्षाच्या परीक्षा अर्जासोबत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

३) Research Methodology या कार्यशाळेतील सहभागाकरीता पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांनी विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्र येथील वैद्यकिय शिक्षण तंत्रज्ञान विभाग (Dept. of Medical Education Technology, (MET), Pune) येथे संपर्क (संपर्क - मा. सहयोगी प्राध्यापक, वैद्यकिय शिक्षण तंत्रज्ञान विभाग, (MET), म.आ.वि.वि. विभागीय केंद्र, पुणे, दुरध्वनी क्र. ०२०-२७२८०४५४, २७२८५६९५) साधून सदर कार्यालयाने केलेल्या नियोजनानुसार प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर नांव नोंदणीबाबतची योग्य ती पूर्व कार्यवाही करुन कार्यशाळेच्या सहभागाबाबतचा कालावधी व ठिकाण निश्चित करुन घ्यावे.

उपरोक्त बाबींची आपल्या महाविद्यालयामार्फत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर परिपत्रकाची प्रत विद्यापीठाच्या www.muhsnashik.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-
कुलसचिव